**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १३ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशातल्या २१० पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचं विशेष आमंत्रण.**
2. **भारतीय वंशाच्या परदेशी नागरिकांना देण्यात येणाऱ्या परदेशी भारतीय कार्डाबाबत नियमांमध्ये बदल.**
3. **क्रीडा क्षेत्राला निधी देऊन आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडविणार- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे.**
4. **आज उद्या आणि परवा नागपूरसह विदर्भाच्या बहुतांश जिल्हयात मुसळधार पावसाची शक्यता.**

**------------------------------------**

पंचायत प्रतिनिधी

देशातील २८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील मिळून २१० पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. आपापल्या गावात पायाभूत सुविधा, सार्वजनिक सेवा, आणि सामूहिक उपक्रम राबवून सुधारणा घडवणाऱ्या सरपंचांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रण देण्यात आलं आहे. यात महिला प्रतिनिधींची संख्या लक्षणीय आहे. 'हर घर नल' जल योजना', प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना आणि इंद्रधनुष अभियानात या प्रतिनिधींनी भरीव कार्य केलं असल्याचं पंचायती राज मंत्रालयानं म्हटलं आहे.या प्रतिनिधींचा उद्या एका विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार असून "आत्मनिर्भर भारत, विकसित भारत की पहचान" अशी यंदाची संकल्पना आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सभा सार या अप्लिकेशनचं उद्घाटनही यावेळी होईल. दरम्यान गोंदिया जिल्ह्याच्या सालेकसा तालुक्यातील भजेपार स्मार्ट ग्रामपंचायतीचे उपक्रमशील सरपंच तथा सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार यांना स्वातंत्र्य दिन राष्ट्रीय परेड सोहळ्यास विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्यासाठी भारत सरकारकडून

मानाचे निमंत्रण प्राप्त झाले आहे. याचे श्रेय त्यांनी सर्व गावकऱ्यांच्या मेहनतीला दिले आहे.

***(होल्ड बाईट - चंद्रकुमार बहेकार ३४ सेकंद)***

***सर्वात आधी माझ्या संपूर्ण भजेपार ग्रामवासियांना या गोष्टीचे श्रेय देण्याचा प्रयत्न करेन. कारण माझ्या ग्रामपंचायत भजेपारमध्ये मागील दोन वर्षांमध्ये ग्रामस्थांनी जे काही लोकसहभाग श्रमदान आणि गावाच्या विकासासाठी जो प्रयत्न केला, जे ग्रामपंचायतीला सहकार्य केलं, त्याच्यामुळे दोन वर्षांमध्ये भजेपार ग्रामपंचायतीला एकंदरीत एक कोटी दहा लाखचे पारितोषिक मिळालेले आहे आणि या सर्व कामांची दखल म्हणून केंद्र सरकारने आम्हाला निमंत्रित केला आहे आणि ही माझ्यासाठी नव्हे, तर संपूर्ण भजेपार ग्रामस्थांसाठी अभिमानाची आणि गौरवाची गोष्ट आहे.***

---

'हर घर तिरंगा'

हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत आजपासून पुढचे तीन दिवस आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या निवासस्थानी तिरंगा फडकावून या अभियानात सहभाग घेतला. हे अभियान आता लोक चळवळ बनली असून, ज्यामुळे देशात एकतेचा संदेश प्रसारित होत असल्याचं शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.या अभियानांतर्गत अनेक केंद्रीय मंत्री आणि राजकीय नेते आपल्या निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकवून या देशभक्ती मोहिमेत सहभागी झाले. क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनीही दिल्लीत शासकीय निवासस्थानी तिरंगा फडकवून स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली अर्पण केली. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ लखनऊ इथं झालेल्या तिरंगा रॅलीत सहभागी झाले होते. दरम्यान, 'हर घर तिरंगा' अभियाना अंतर्गत इतरही अनेक उपक्रम राबवले जात आहेत. ठिकठिकाणी निघालेल्या तिरंगा फेऱ्यांमध्ये नागरीक उत्स्फुर्त सहभाग नोंदवत आहेत. या अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने आज झिरो माईल फ्रीडम पार्क येथे तिरंगा कॅनव्हास उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी १५० हून अधिक चित्रकारांनी तिरंगा कॅनव्हास साकारले. वाशीम जिल्ह्यातील कारंजा-तालुक्यातील पी.एम.श्री.जिल्हा परिषद शाळा कामरगाव यांच्यावतीने हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत आज

स्वच्छता जनजागरण प्रभात फेरी काढण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनीस्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा घेतली. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर हर घर तिरंगा अभियानाच्या अंतर्गत 'स्वातंत्र्याचा उत्सव स्वच्छते सोबत' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याशिवाय आज  नशा मुक्तीची शपथ घेण्यात आली. चंद्रपूर मनपातर्फे उद्या 14 ऑगस्ट रोजी हार घर तिरंगा अभियाना अंतर्गत सकाळी 9 वाजता प्रियदर्शिनी चौक येथुन बाईक रॅलीचे तसेच संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज जयंती निमीत्य 15 ऑगस्ट रोजी सांयकाळी 5 वाजता गांधी चौक येथुन पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

------------------------------------

तिरंगा संगीत संध्या

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचं औचित्य साधून, तीनही सशस्त्र दलांनी तसंच तटरक्षक दल, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल आणि राष्ट्रीय छात्र सेनेनं देशभरात १४२ ठिकाणी विशेष वाद्यवृंद सादरीकरणाचं आयोजन केलं आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या गौरवार्थ तसंच देशवासियांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्यासाठी आणि ऑपरेशन सिंदूरचं यश साजरं करण्यासाठी १५ ऑगस्टला संध्याकाळी हे सादरीकरण केलं जाणार आहे. भारतीय वायुसेनेच्या नागपुरातील देखभाल कमांड मुख्यालयातर्फे देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवारी  फुटाळा तलाव इथं देशभक्तीमय तिरंगा संगीत संध्या आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी पाच वाजता आयोजित या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वातंत्र्य सैनिक, सशस्त्र दलांचे शौर्य, ऑपरेशन सिंदूरच्या यशाचा गौरव करण्यात येईल.

------------------------------------

परदेशी भारतीय कार्ड

भारतीय वंशाच्या परदेशी नागरिकांना देण्यात येणाऱ्या परदेशी भारतीय कार्डाबाबत  नियमांमध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने काही सुधारणा केल्या आहेत. एखाद्या ओसीआय नागरिकाला दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल किंवा सात वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाच्या शिक्षेसाठी आरोपपत्र दाखल झालं असेल तर त्या व्यक्तीचं परदेशस्थ नागरिकत्व रद्द केलं जाईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या काही वर्षांमधे ओसीआय कार्डधारक

नागरिकांचा गुन्ह्यांमध्ये अथवा देशविरोधी कारवायांमध्ये सहभाग असल्याचं आढळून आल्यानंतर गृह मंत्रालयानं नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

------------------------------------

करार

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने भारतीय सांख्यिकी संस्थेसोबत डेटा-आधारित नावीन्यपूर्ण संशोधनासाठी पाच वर्षांचा करार केला आहे. प्राधिकरणाच्या उपमहासंचालक तनुश्री देब बर्मा आणि भारतीय सांख्यिकी संस्थेच्या बंगळूरू केंद्र प्रमुख बी. एस. दया सागर यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या कराराद्वारे आधार संबंधित व्यवहारांना अधिक बळकटी दिली जाईल, तसंच त्यांची सुरक्षा आणि विश्वासार्हता वाढवली जाईल.

------------------------------------

आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडविणार-चंद्रशेखर बावनकुळे

बदलत्या काळानुसार मातीवरील कुस्ती आता मॅटवर खेळायला सुरुवात झाली आहे. मातीवरील कुस्तीला महत्त्व असले, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅटवरील कुस्तीला महत्त्व आहे. त्यामुळे येत्या काळात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी क्रीडा क्षेत्राला पुरेपूर निधी घेऊन सक्षम करण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. विभागीय क्रीडा संकुलात आज कुस्ती मॅट आणि इतर क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले. अमरावतीला पुण्याशी जोडण्यासाठी वंदे भारत रेल्वे सुरू करण्यात आली आहे. हा विकसित भारताचा संकल्प राहणार आहे. येत्या काळात विमानानेही पुण्याला जोडण्याचा प्रयत्न राहणार आहे. आज भारत प्रत्येक क्षेत्रात इतिहास घडवत असून क्रीडाक्षेत्रही मागे राहिलेला नाही. त्यामुळे दर्जेदार क्रीडा सोयीसुविधा उपलब्ध करून अमरावतीला क्रीडा क्षेत्रात पुढे न्यायचे आहे.

------------------------------------

होळकर पुण्यतिथी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आज पुण्यतिथी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यादेवी होळकर यांना आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशातून अभिवादन केलं आहे. कुशल प्रशासक, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना स्मृतिदिनी त्रिवार वंदन असं मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या समाज

माध्यमावरच्या संदेशात 'अहिल्यादेवी या कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्वाचं मूर्तिमंत प्रतीक होत्या. त्यांचं सेवाभावानं ओतप्रोत असं सामाजिक परिवर्तनाचं अतुलनीय कार्य आजही प्रेरणादायी आहे', अशा शब्दात अहिल्यादेवींना अभिवादन केलं आहे. अत्यंत कुशल प्रशासक, उत्तम संघटक, न्यायप्रिय आणि दूरदृष्टी असलेल्या लोक कल्याणकारी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

-----------------------------------

मंडलयात्रा

आज राष्ट्रवादीच्या वतीने मंडलयात्रा भंडाऱ्यात दाखल झाली. या दरम्यान शेतकऱ्यांच्या विविध मागण्या करीता भंडारा शहरातून बैल बंडीने मोर्चा काढण्यात आला. त्रिमूर्ती  चौकात सभेच्या स्वरूपात या मोर्चाची सांगता झाली. रोहित पवार यांच्या नेतृत्वात भर पावसात शहरातून मोर्चा काढण्यात आला. यावेळी त्यांनी  सरकारला खडेबोल सुनावले.

-----------------------------------

हवामान

आज उद्या आणि परवा नागपूर सह विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. पूर्व विदर्भातील नागपूर भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा येलो अलर्टजरी करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पश्चिम विदर्भातील बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे तर उर्वरित अमरावती वर्धा वाशिम यवतमाळ चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात देखील विजांच्या कडकडाटासह वादळ आणि मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याच आवाहन विभागातर्फे करण्यात आल आहे. उद्या आणि परवा देखील असंच पर्जन्यमान राहू शकते. यवतमाळ मध्ये आज पहाटेपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विदर्भ मराठवाडा सीमेवरील ईसापूर धरणाचे तीन दरवाजे 50 सेंटिमीटरने उघडण्यात आले आहेत. दरम्यान, येत्या काही तासात भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांच्या काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो तर अमरावती जिल्ह्यांतील अनेक ठिकाणी

तसेच वर्धा, गोंदिया, नागपूर जिल्ह्यांतील काही ठिकाणी हलक्यां ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

-------------------------------------